स.के.नं. ३३२/२०१७
नि. क्र. १२ लगत

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ ची जबानी
माझे नाव – संजय हरिश्चंद्र सुतार
वय वर्षे –५०, व्यवसाय – सुतारकाम
राहणार – वालोपे, देऊळवाडी, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
मी सत्य प्रतिज्ञेवर असे कथन करतो की,

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीम.एम.ए.दावत यांचेमार्फत सुरु.</u>**

दि.०८.०४.२०१७ रोजी सुतारकामानिमित्त पेठमाप परिसरात होतो. माझा रविंद्र दगडू नांदविसकर हा चुलत भाऊ असून त्याचा मुलगा दर्शन मुंबईहून आमच्या घरी पाहूणे म्हणून राहण्यास आला होता. माझा मित्र संदेश अहिरे याने मला फोन करून सांगितले की, दर्शन हा एम८० दुचाकी क्रमांक एमएच ०८ डी ८९७९ घेवून जात असताना मुंबई–गोवा महामार्गावरील वालोपे बेंडकरवाडी एस.टी स्टॉप जवळ त्याचा अपघात झाला आहे. म्हणून मी लाईफ केअर हॉस्पीटल येथे गेलो. तेथे गेल्यानंतर असे समजले की, तो दवाखाण्यात दाखल करण्यापुर्वी मयत झाला.

२. सदरचा अपघात बोलेरे वाहन क्र.एमएच ०४ जीएफ ५५८७ वरील चालक श्रीकांत हनुमान बोराटे यांनी समोरुन दर्शनच्या दुचाकीला ठोकले. सदरचा अपघात बोराटे याच्या चुकीमुळे झाला असून दर्शनच्या मृत्युला कारणीभूत ठरला. दर्शनला लाईफकेअर हॉस्पीटला बोराटे व दखनी यांनी आणले होते. घटनेची फिर्यादी मी पोलीस स्टेशनला दिली. आता मला ती फिर्यादी दाखवण्यात आली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी हजर नाही. दि.०८.०४.२०१७ रोजीच्या जबाबास **नि.१५** देण्यात येते.

सरतपास पुर्ण

**<u>उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. एस.एन.मोहिते यांचे तर्फे सुरु</u>**

३. हे म्हणणे खरे नाही की, वालोपे बेंडकरवाडी येथे एस.टी. स्टॉप असल्याने

तेथे वाहनांची व नागरीकांची वर्दळ असते व तो परीसर नेहमी गजबजलेला असतो. हे म्हणणे खरे आहे की, चिपळूण– बहादुशेख नाका ते मुंबई गोवा हायवे व मुंबई गोवा हायवे बहादुरशेख नाका ते चिपळूण कडे येणा–या जाणा–या वाहनांची नेहमी वर्दळ असते. हे म्हणणे खरे आहे की, सकाळी ०९.०० ते साधारण १०.३० ते ११.०० वा. पर्यंत वालोपे बेंडकरवाडी एस.टी स्टॉप जवळ शाळेत जाणा–या विद्यार्थ्यांची व कामावर जाणा–या लोंकांची गर्दी असते.

**४.** मयत दर्शनचे घटना घडली त्यावेळी वय साधारण १३ ते १४ वर्षे होते. अपघातातील दुचाकी एम–८० चांदे यांच्या मालकीची होती. हे म्हणणे खरे आहे की, घटना मी प्रत्यक्ष पाहिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनेची माहीती मित्राने सांगितल्यावर समजली. हे म्हणणे खरे आहे की, वाहनाचे क्रमांक मला मित्राने सांगितल्यानंतर समजले. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रत्यक्ष घटनास्थळी जावून वाहनांचे क्रमांक पाहीले नाहीत. मला दोन वेळेस पोलीस स्टेशनला जाण्याचा योग आला. मी पोलीस स्टेशनला कधी गेलो त्याच्या तारखा सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती.
सही/–
(वाय.सी. पाटील )

दिनांक –२४/०९/२०२५
चिपळूण.

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, व
न्यायादंडाधिकारी वर्ग–१,चिपळूण

# <u>- प्रमाणपत्र -</u>

मी हमी देतो की, सदरच्या पी. डी. एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ पुराव्यामधील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | एम.इ.आरेकर, लघुलेखक श्रेणी–३ |
| **न्यायालयाचे नाव** | **सह दिवाणी न्यायालय क.स्तर, चिपळूण, ता.चिपळूण जि.रत्नागिरी.** |
| पुरावा टंकलेखीत दिनांक | २४.०९.२०२५ |
| न्यायिक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | २४.०९.२०२५ |
| पुरावा अपलोड केलेले दिनांक | २४.०९.२०२५ |